# फुले, शाहू, आंबेडकरवाद समाजक्रांतीची नवी दिशा

डॉ. बाबुराव गुरव

**शलाखा प्रकाशन**
कोल्हापूर.

निळूभाऊ फुले
डॉ. आ. ह. साळुंखे
बाबुराव बागूल



आपले बोट धरुन चालत राहिलो
विचार प्रकाशाची वाट
उजळत चाललीय !

## संवाद.....

"फुले, शाहू, आंबेडकरवाद : समाजक्रांतीची नवी दिशा" हा छोटा निबंध आपल्या हाती देताना आनंद होत आहे. विद्यापीठ पातळी, चळवळी, नियतकालीके, चर्चासत्रे, परिसंवाद, जयंती कार्यक्रम, अभ्यासक्रम, निवडणूकीतली भाषणे, निष्ठा, संबंध, प्रस्थापित करण्यासाठीचे प्रचारतंत्र, श्रेयवादासाठीची मांडणी अशा विविध पातळ्यांवर सध्या फुले, शाहू, आंबेडकरांची नावे घेतली जातात. वृत्तपत्रीय बातम्यात, चर्चेत झळकविली जातात. आपले नाव फोटोसोबत असले पाहिजे. याची दक्षता घेतली जाते.

या विषयावर सध्या लेखनही बऱ्यापैकी होते आहे. चरित्रात्मक पद्धतीच्या लेखनावर जास्त भर असतो. तीच ती माहिती पुन: पुन्हा मांडली जाते. भावनात्मक पद्धतीने व्यक्तीगौरवाकडे जास्त कल आढळतो. फुले, शाहू, आंबेडकर हे समाजक्रांतीकारी विचारवंत आहेत. कृतीशिलता हे त्यांच्या व्यक्तीमत्त्वाचे खरे वेगळेपण आहे. हजारो वर्षे विषमतेच्या गर्तेत अडकलेल्या, शोषणविषय ठरलेल्या भारतातील हिंदूधर्मातल्या स्त्री शुद्रातिशुद्रांच्या मुक्तीचे तत्वज्ञान या तिघांनी मांडले आहे. परिवर्तनाच्या प्रक्रियेला त्यांनी केवळ गती दिली नाही तर समतामूलक, उत्पादक, शोषणमुक्त नवसमाजरचनेचे संपूर्ण चित्र त्यांच्या विचार कृतीतून उभे राहते. या विषयाची संशोधनात्मक पातळीवरची, एक वाद म्हणून मांडणी अभावानेच होताना दिसते. तिघांचा एकत्र, एकसंघ, सलग विचार फारसा कोणी केलेला हाती लागत नाही.

नाशिक येथील मराठा शिक्षण प्रसारक मंडळाच्या के.टी.एच.एम. महाविद्यालयाने पुणे विद्यापीठातल्या समाजशास्त्रांच्या प्राध्यापकांसाठी २ एप्रिल ते २५ एप्रिल या कालावधीत एक अभ्यासवर्ग संघटीत केला होता.